# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /1016 /२०१८ दिनांक: 27 / 9 /२०१८

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित महाविद्यालय,
(जिल्हा –चंद्रपुर व गडचिरोली )

विषय :– राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

संदर्भ :–१. क्र. उशिनाग/राजर्षी छत्रपती शाहु महा.शि.शु. शिष्यवृत्ती/९७८४
दिनांक २७/०८/२०१८ प्राप्त दिनांक १५/०९/२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणांस सुचित करण्यात येते कि, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांच्याकडुन राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबतचे पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्र यासोबत संलग्नित करण्यात आलेले आहे. करीता विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाने सदर पत्राचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही महाविद्यालय स्तरावरुन करावी.

आपला विश्वासु

सहपत्र:–संलग्नित

(डॉ. व्ही. सी. सिलारे )
उपकुलसचिव (म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१
Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com
Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210

क्रं.उशिनाग/ राजर्षी छत्रपती शाहू महा. शि. शु.शिष्यवृत्ती/ ६७८४ दिनांक २७.०८.२०१८

प्रति,

१) कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर

२) कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

३) कुलसचिव,
कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक

४)कुलसचिव,
महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्स सिटी, नागपूर

५) प्राचार्य शासकीय/अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये (सर्व)

गोंडवाना वि... ...गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 670 दिनांक 15/9/18
जावक क्र. ........ दिनांक ........

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अमंलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ :- **१) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/पक्र ३३२/ तांशि ४, दिनांक ०७/१०/२०१७**
**२) शासन परिपत्रक ईबीसी २०१८/प्रक्र ३८/तांशि ४, दिनांक १४/०२/२०१८**
**३) शासन निर्णय संकीर्ण २०१७/प्रक्र ४०७/तांशि ४, दिनांक २२/०२/२०१८**
**४) शासन निर्णय टीईएम २०१८/प्रक्र ३५/तांशि ४, दिनांक ३१/०३/२०१८**
**५) शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्रक्र १२०/तांशि ४, दिनांक ०२/०८/२०१८**
**६) शासन निर्णय संकीर्ण २०१७/प्रक्र ३३२/तांशि ४, दिनांक ०७/०८/२०१८**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय क्र १ अन्वये आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ पासून लागु करण्यात आलेली आहे. त्यामध्ये संदर्भीय शासन निर्णयान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेचे ठळक वैशिष्टये पुढील प्रमाणे

**पात्र विद्यार्थी** :- व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी.

**पालकाची उत्पन्न मर्यादा** :- ८.०० लाखापर्यंत

**व्याप्ती** :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अकृषिक विद्यापीठे/ शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित महाविद्यालये.

**राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती :-**

बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम :- १०० टक्के

व्यावसायीक अभ्यासक्रम उत्पन्न २.५० लाखापर्यंत : १०० टक्के
(शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालय)

व्यावसायीक अभ्यासक्रम उत्पन्न २.५०ते ८.०० लाखापर्यंत : ५० टक्के
(शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालय)

व्यावसायीक अभ्यासक्रम कायम विना अनुदानित महाविद्यालय उत्पन्न ८.०० लाखापर्यंत : ५० टक्के

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजने अंतर्गत परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती**

व्यावसायीक अभ्यासक्रम :- ५० टक्के

बिगर व्यावसायीक अभ्यासक्रम :- १०० टक्के

**१.०० लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता**

व्यावसायीक अभ्यासक्रम :- ३०००/- प्रति वर्षे

बिगर व्यावसायीक अभ्यासक्र :- २०००/- प्रति वर्षे

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना**

शासनाने निर्धारीत केलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेतलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय/ निमशासकीय/ खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न २.०० लाखापर्यंत आहे.

नागपूर शहरासाठी :- १००००/- प्रति वर्षे

इतर शहरासाठी :- ८०००/- प्रति वर्षे

सन २०१८-१९ साठी सदर योजनेची www.mahadbtmahait.gov.in पोर्टलद्वारे ऑनलाईन अमंलबजावणी करण्यात येणार असल्याने सदर योजनेचे प्रभावी अमंलबजावणीसाठी महाविद्यालयाद्वारे सदर योजनेस व्यापक प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. **सदर योजनेमध्ये आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील मुलांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्यासाठी महाविद्यालयाचे दर्शनी भागात, नोटीस बोर्ड वर सदर योजनेची माहिती देणारे फलक लावण्यात यावेत.**

महाविद्यालयात शिकत असलेल्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना या योजनेबाबत माहिती देण्यात यावी. सदर योजनेच्या प्रचार प्रसिद्धीसाठी विद्यार्थी व शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यामधून माहितीदूत नेमूण योजनेस व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. **सदर योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे जसे पालकांचे गेल्यावर्षीचे उत्पन्न प्रमाणपत्र, डोमीसाईल सर्टीफिकेट, आधार संलग्नीत मोबाईल नंबर, आधार संलग्नीत बँक खाते, शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक माहिती अद्यावत ठेवण्याबाबत विद्यार्थ्यांना सांगण्यात यावे.**

विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करणेसाठी आवश्यक संगणक, इंटरनेट, स्कॅनर, प्रिंटर सुविधा पुरेशा प्रमाणात महाविद्यालयात उपलब्ध करण्यात यावी. महाविद्यालय स्तरावर सदर योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कमिटी तयार करून सदर योजनेच्या प्रभावी अमंलबजावणी करण्यात यावी.

**आपले महाविद्यालयातील कोणताही पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, पात्र लाभार्थी सदर योजनेपासुन वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.**

(डॉ. अर्चना नेरकर)
सहसंचालक,
उच्चशिक्षण नागपूर विभाग,